वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (वनामती), नागपूर या प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेत निबंधक तथा सहायक प्राध्यापक गट-अ या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्तीबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन आदेश क्र. प्रतिनि २०२६/प्र.क्र.१०५/प्रशि-४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- २६ नोव्हेंबर, २०२६

संदर्भ :- १) शासन निर्णय, सा.प्र.वि.एसआरव्ही-२०११/प्र.क्र. १३७/१२, दि.१७.१२.२०१६.
२) शासन निर्णय, सा.प्र.वि.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/१२, दि. १६.०२.२०१८.
३) वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (वनामती), नागपूर यांचे पत्र क्र.जाहिरात ००३२६/वनामती/सीपीटीपी/एसटीपी/१००५/२०२६,दि.११.०३.२०२६
४) महसूल व वन विभाग पत्र क्र. प्रतिनि-०४२४/प्र.क्र.१०९/आस्था-२(ई-१७९६५०२) दि.२६.१०.२०२६.

शासन आदेश :-

वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (वनामती), नागपूर या प्रशिक्षण संस्थेत राज्य प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत निबंधक तथा सहायक प्राध्यापक गट-अ (वेतनश्रेणी एस-१९: ५५१००-१७५१००) या रिक्त असलेल्या पदाकरीता प्रतिनियुक्ती धोरणाच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार श्री.निर्भय सुभाष जैन, उप जिल्हाधिकारी (एस-२०: ५६१००-१७७५००) यांना खालील तक्त्यात नमूद केल्यानुसार प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्यात येत आहे. :-

अ.क्र.	नाव /पदनाम/वेतनश्रेणी	मुळ प्रशासकीय विभाग	प्रतिनियुक्तीचे पद/ वेतनश्रेणी	प्रतिनियुक्तीचा दिनांक	प्रतिनियुक्तीचा कालावधी
१	श्री.निर्भय सुभाष जैन उप जिल्हाधिकारी (एस-२० : ५६१००-१७७५००)	महसूल व वन विभाग	निबंधक तथा सहायक प्राध्यापक गट-अ (एस-१९-५५१००-१७५१००)	आदेशाच्या दिनांकापासून	३ वर्ष

२. महसूल व वन विभागाने श्री निर्भय सुभाष जैन, उप जिल्हाधिकारी यांच्या प्रतिनियुक्तीची नोंद घेवून आवश्यक ती कार्यवाही करावी.

३. सदर प्रतिनियुक्ती महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा....) नियम १९८१ च्या परिशिष्ट २ मधील खालील अटी व शर्तींच्या अधीन राहील. :-

(१) प्रस्तुत प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी संबंधित विभागास लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीने सेवेची आवश्यकता वाटल्यास सदर अधिका-यास परत बोलविण्यात येईल. वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (वनामती), नागपूर या संस्थेस वरील अधिका-यांच्या सेवेची आवश्यकता नसल्यास संबंधितांना त्याबाबत ३ महिन्याची नोटीस द्यावी व शासनास सदर बाब अवगत करण्यात यावी.

(२) प्रतिनियुक्तीवर असतानाच्या कालावधीतील वेतनाचा/रजा वेतनाचा खर्च वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (वनामती), नागपूर या संस्थेने करावा.

(३) महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा....) नियम १९८१ च्या परिशिष्ट-४ अन्वये विहित केलेल्या दरानुसार वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (वनामती), नागपूर या संस्थेकडून रजा वेतन व निवृत्ती वेतन अंशदान देण्यात यावे.

(४) सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीमधील वर्गणी चालू ठेवण्यात यावी.

(५) संबंधित अधिका-याविरुध्द विभागीय चौकशी करावयाची झाल्यास त्यांच्या सेवा मुळ विभागाकडे परत करण्यात याव्यात.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६११२६१०५३४५६२०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NAMRATA SHASHANK BHARSAKHALE

Digitally signed by NAMRATA SHASHANK BHARSAKHALE
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=AFC239A04F8765FDFAFF5B427895A52F52390A276568759DF519AEA12578512C, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E7A55E217A5A7B81D43819C528413DCC573FB455C923C289F62184B4155ED280, cn=NAMRATA SHASHANK BHARSAKHALE
Date: 2026.11.26 10:54:24 +05'30'

(नम्रता भारसाखळे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति :-

१) संचालक, वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (वनामती), नागपूर
२) विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर
३) आयुक्त, नागपूर महानगर पालिका, नागपूर
४) उपसचिव (आस्था-२) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
५) निबंधक तथा सहायक प्राध्यापक, वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (वनामती), नागपूर
६) सहायक लेखाधिकारी, वनामती, नागपूर
७) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर
८) श्री.निर्भय सुभाष जैन, उप आयुक्त (साप्रवि) नागपूर महानगर पालिका, नागपूर
९) निवडनस्ती/प्रशि-४